**<u>दरपत्रक मागणी</u>**

जा.क्र.जिपसो/शिक्षण/सशिअ/लेखा/ 3226 /2026
प्राथमिक शिक्षण विभाग,जि.प.सोलापूर
दिनांक:- 17/02/2026

**प्रति,**

____________________

--------------------------------

--------------------------------

विषय:- समग्र शिक्षा , अंतर्गत खाजगी वाहन दरकरारावर घेणेबाबत...

-----

उपरोक्त विषयान्वये समग्र शिक्षा अभियान अंतर्गत पुर्णवेळ खाजगी वाहन भाडेतत्वावर घेणे आहे.तरी सोबत जोडलेले वाहनाचे दरपत्र भरुन या कार्यालयाकडे दि. 27/02/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

मा. मु.का.अ. यांचे मान्यतेने

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

**समग्र शिक्षा प्राथमिक शिक्षण विभाग**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

---

**दर पत्रक नमुना**

१) वाहन धारकाचे संपूर्ण नाव/ संस्थेचे नांव ----------------------------------

२) पत्र व्यवहारासाठी संपूर्ण पत्ता (दुरध्वनीसह) ----------------------------------
----------------------------------

३) वाहन क्रमांक ----------------------------------

४) वाहनाचा प्रकार/ निर्मितीचे वर्ष व दिनांक ----------------------------------

५) वाहन प्रवासी (वाहतूक करण्याचा) परवाना क्रमांक ----------------------------------
----------------------------------

६) वाहन चालकाचे संपूर्ण नांव व पत्ता (दुरध्वनीसह) ----------------------------------
----------------------------------
----------------------------------

७) वाहन चालकाचा परवाना क्रमांक (सोबत झेरॉक्स प्रत जोडावी) ----------------------------------
----------------------------------

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | पहिल्या २००० कि.मी.साठी दर प्रति महिना रक्कम रुपये (प्रति.किमी) | २००० कि.मी. वापरानंतर प्रति कि.मी. साठी दर |
|---|---|---|---|
| १. | Honda City / Ciaz/ Swift desire/ Ameze/ Toyota Etios/ Eritiga / figo aspire/Ac व समकक्ष वाहनाचा रंग पांढरा | | |
| २ | अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र | जोडले आहे/नाही | पृष्ठ क्रमांक |
| ३ | वाहन भाडेतत्वार घेणेचा अनुभव | जोडले आहे/नाही | पृष्ठ क्रमांक |
| ४ | वाहनाचे /चालकाचे सर्व कागदपत्र | जोडले आहे/नाही | पृष्ठ क्रमांक |
| ५ | वाहनास अपघात झाल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र | जोडले आहे/नाही | पृष्ठ क्रमांक |
| ६ | इतर कागदपत्रे जोडली असल्यास | जोडले आहे/नाही | पृष्ठ क्रमांक |

**स्थळ :-** --------------------- **वाहन मालकाची सही**

**दिनांक :-**

समग्र शिक्षा

**प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद, सोलापूर**

---

**वाहन दरपत्रक**

**नियम व अटी/शर्ती**

1. सदर दरपत्रकाच्या संदर्भात मंजूरीचे सर्व अधिकार मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचे आदेश अंतिम राहतील. दरपत्रक रदद अथवा त्यातील अटी व शर्तीत बदल करण्याचे अधिकार हे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असतील.
2. सदर दरपत्रकाचा कालावधी हा कार्यारंभ आदेशापासून 11 महिन्याचा असेल.
3. सदर कामाचा शासकीय / निमशासकीय कार्यालयास वाहन भाडेतत्वावर किमान 3 वर्षाचा अनुभव आवश्यक असेल.
4. सदरचे वाहन वातानुकूलित असावे.
5. वाहनाचे /चालकाचे सर्व कागदपत्रक जसे विमाप्रमाणपत्र, योग्यता प्रमाणपत्र, पी.यु.सी. चालकाचा वाहनपरवाना आवश्यक आहेत.
6. वाहन हे पुरवठा दाराचा स्वत:च्या किंवा फर्मच्या मालकीचे असावे.
7. वाहनास अपघात झाल्यास व दूदैवाने वाहनचालकास गंभीर स्वरुपाच्या इजा झाल्यास वाहन चालकास वैद्यकिय खर्च अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व या कार्यालयावर असणार नाही.
8. वाहन नादुरूस्त / खराब / अपघातग्रस्त झाल्यास लगेच दुसरे बदली वाहन पुरविण्याची जबाबदारी वाहन मालकाची असावी. वाहन वेळेत पुरवठा न केल्यास प्रति दिन रु 2000/- इतका दंड आकारण्यात येईल.
9. वाहनाचा मेंटेनन्स खर्च, इतरखर्च तसेच अपघात झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी वाहन मालकाची राहिल.
10. देयक अदा करते वेळी शासकिय नियमाने जे वजाती असतील ते नियमानुसार वजा केले जातील.

11. वाहनाचा रंग शक्यतो पांढरा असावा.

12. वाहन पुरवठादार संख्या नोंदणीकृत असावी.

13. मंजूर दर हे पूर्ण कालावधीकरीता असतील व इंधनाचा खर्च दरकरारामध्ये एकत्रितरित्या समाविष्ठ असल्याने स्वतंत्र इंधनाचे देयक / रक्कम अदा करण्यात येणार नाही. तसेच कोणत्याही कारणाने इंधनाचे दर बाजारात वाढले असता दर करारातील मंजूर रक्कमेत वाढ करण्यात येणार नाही. अनुदान उपलब्धते नुसार देयक अदा करण्यात येईल.

14. कार्यालयास पुरविण्यात येणारे वाहन सुस्थितीत असणे आवश्यक आहे. प्रवासा दरम्यान पुरेसे इंधन भरणे, वाहनाचा विमा उतरवणे, पीयुसी प्रमाणपत्र घेणे, फास्ट टॅग व वाहनात काही बिघाड झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

15. वाहन प्रकारात सर्वसाधारणपणे न्युनतम दर नमूद केलेल्या संस्थेत प्रथम चर्चेसाठी बोलविण्यात येईल.दरपत्रक धारकाची अटी व शर्तीप्रमाणे पात्रता तपासण्यात येईल.

16. संस्थेची जबाबदारी असेल की, वाहनाचा व वाहनातील प्रवाशांचा थर्ड पार्टी संपूर्ण विमा (Full Insurance) काढावा व विम्याची कागदपत्रे गाडीसोबत ठेवावी व विम्याचा पुरावा दरपत्रकासोबत सादर करावा.

17. वाहन भाडेतत्वावरील सेवा पुरवितेवेळी वाहनास किंवा तिऱ्हाईताचे अपघात होऊन नुकसान झाले तर प्रस्तूत कार्यालय होणाऱ्या नुकसानीस जबाबदारी राहणार नाही. या संबंधी संपूर्ण जबाबदारी ही वाहन पुरवठादार संस्थेवर राहील.

18. भाडे तत्वावरील वाहन व चालक हे 24 तास या कार्यालयाच्या अधिनस्त राहतील. सदरचे वाहन ग्रामीण भागात दिवसा व रात्री प्रकल्प कार्यासाठी वापरण्यात येईल. प्रकल्पाच्या कामाव्यतिरिक्त इतर कारणांसाठी वाहन मालकांस पूर्व परवानगी शिवाय व अशी परवानगी प्राप्त झाल्याशिवाय वाहन वापरता येणार नाही.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, सोलापूर